SHIVAJI
UNIVERSITY KOLHAPUR

Golden Jubilee Year 2019-20 of

# Department of Political Science

&

# Shivaji University Political Science Association

# Conference Prociding of Two Days National Seminar

&

37th Maharashtra Political Science & Public Administration Conference

# "Contemporary Issues in Political Science"

10th & 11th January 2020



Navjyot

ISSN - 2277 - 8063

International Interdisciplinary research Journal

(Humanities, Social Sciences, languages, Commerce & Management)

SHIVAJI
UNIVERSITY KOLHAPUR

Golden Jubilee Year 2019-20 of

# Department of Political Science

&

# Shivaji University Political Science Association

# Conference Prociding of Two Days National Seminar

&

37th Maharashtra Political Science & Public Administration Conference

# "Contemporary Issues in Political Science"

10th & 11th January 2020


Editor
Prof. (Dr.) Ravindra Bhanage
Head of Department,
Political Science, Shivaji University,Kolhapur



Navjyot

ISSN - 2277 - 8063
International Interdisciplinary research Journal
(Humanities, Social Sciences, languages, Commerce & Management)

# गांधी विचारांची प्रस्तुतता

संदीप तुंडूरवार, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. राहूल बावगे,वसंतराव नाईक कला शासकीय समाजविज्ञान संस्था, नागपूर

.................................................................................

विषय प्रारंभ

''गांधी की लो शरण बदल डालो मिलकर संसार
या फिर रहो कल्की के हाथो मिटने को तैयार
पहूँच गयी है घडी फैसला अब करना ही होगा
दो मे से किसी एक राह पर, पगले पग धरना ही होगा।''[१]

राष्ट्रकवी दिनकर यांनी या काव्यातून केलेले रेखाटन फार बोलके आहे. आधुनिक जग ज्या तांत्रिक प्रगतीच्या उच्चतम शिखराकडे कूच करू लागलेले आहेत त्या संदर्भात विचार करणे क्रमप्राप्त आहे. औद्योगिकीकरणाचा पाया घातल्या जाउन केवळ तीन शतकांचा कालखंड उलटलेला आहे. या स्थितीत मात्र मनुष्याच्या जीवन जगण्याचे, अस्तित्वाचे प्रश्न उग्र बनलेले दिसत आहे. तंत्रज्ञानाच्या बेसुमार क्रांतीने मानवी व्यवस्थेतील मूल्यांमध्ये प्रचंड महदअंतर निर्माण केलेत. प्रथम शतक ते सतराव्या शतकापर्यंत अमानुष युध्दातून, धर्मवादाच्या, श्रेष्ठत्वाच्या वेडाचारातून प्रचंड हिंसा करीत मानवी रचना संपविण्याचा प्रयत्न केला,तर औद्योगिकरणाने रणभूमीवरील संदर्भ बदलवून नव्या गुलामीची शृंखला तयार करण्यास सुरूवात केली. वसाहतवाद, बडी उद्योगे, कच्च्या मालाच्या उत्पादनाकरीता श्रमीकांची लयलूट हे सतराव्या शतकानंतरचे वैशिष्टये होय. गांधीना आपल्या समकाळात त्यातून उद्‌भवणारे प्रश्न, गुंतागुंत, याची जाणीव होती. द. आफ्रिकेतील स्थिती, इंग्लडमधील वातावरण, युरोपातील वर्चस्ववाद, गांधींनी अनुभवला, पाहिलेला होता. शस्त्रसामर्थ्याचा अमानवीय व्यापार त्याचे अतिव परिणाम गांधीना त्यांच्याच हयातीत पहायला मिळाले होते. त्यामुळे त्यांचा एक विशिष्ट दृष्टीकोन जो तयार झालेला होता तो अधिकाधिक दृढझालेला दिसून येतो. १९०९ मध्ये गांधींनी हिंद—स्वराज पुस्तिका लिहिली त्यात उमटलेले भाव त्यांना पुढील विनाशाची नांदी वाटत होती. त्यांचा औद्योगिकीकरण, नवतावाद, आधुनिकीकरण यांना विरोध नव्हता परंतु यातून मानवी जीवनासमोर जे संकट उभे ठाकलेत वा पुढे गंभीरता येणार होती, याबाबतच्या व्यवहाराला विरोध होता. यातूनच पुढे ठाकलेल्या पर्यावरणाच्या प्रश्नाचाही त्यांनी सखोल विचार करून निर्माण झालेल्या उथळपणावर भाष्य केलेत.

**यंत्रासंबधीची धारणा व विद्यमान संदर्भ**

गांधीचा यंत्राला विरोध नव्हता परंतु यंत्रावि८यीच्या पागलपनाला मात्र विरोध होता या संदर्भात ते म्हणतातष्सामान्य बुध्दी रखनेवाले व्यक्ती की हैसियत से मै जानता हूँ की मनुष्य उद्योग बिना जिन्दा नही रह सकता, इसिलीए मै उद्योगीकरण के खिलाफ नही हो सकता. लेकीन यंत्रोद्योग के बारे मे एक बडी चिन्ता है. यंत्र से उत्पादन बहूत तेजी से हो सकता है और उसके साथ इस प्रकार की अर्थव्यवस्था आ जाती है, जिसका मै समर्थन नही कर सकता, मै ऐसी चीज को स्विकार नही कर सकता जिसके बुरे परिणामो को मै उससे होनेवाले लाभ की अपेक्षा ज्यादा पाता हूँ[२] गांधी का विरोध तर्क के आधार पर या इसिलिए वे कहते थे तंत्रज्ञान से जो व्यवस्था खडी हूई उसके खिलाफ नही लेकीन उसके पागल पण से है' गांधीची भूमिका तर्कशुध्द आहे. भारत व पाश्चात्य जग यांच्याशी तुलना करताना त्यांनी काही बाबी स्पष्ट केल्यात. युरोप व अमेरिकेत तंत्रज्ञानाचा वापर त्यांना अयोग्य वाटत नाही ते म्हणतात युरोपात लोकसंख्या कमी आहे. तर अमेरिकेत भूभाग अधिक व लोकसंख्या विरळ आहे त्यामुळे तेथे भौतिकवाद असू शकतो परंतु भारतासारख्या देशाना तो परवडणारा नाही. यूरोपातील बडया उद्योगातून भौतिक बदल तर घडून आला पण तेथील मूल्यव्यवस्थेत मोठे परिवर्तन आलेत. त्यातून गुलामीची रचना उभी झाली. विषमता, भेदभाव याना पोषक वातावरण मिळाले सोबतच युध्दाचीही मानसिकता उभी झाली. साम्राज्य वाढविण्याकरीता युरोपातील राष्ट्रांनी आपल्याच लोकांचा वापर करून

अहोरात्र शस्त्र निर्मितीवर भर दिला. त्यातून प्रथम व द्वितीय महायुध्द उभे झाले, कोटयावधीचा नरसंहार घडून आला. वित्तहानी, मूल्यहानी यांची तर मोजदादच नाही अशा परिस्थितीत अवजड उद्योगांची उभारणी एकप्रकारे विनाशालाच आमंत्रण होय. जगभरातील भांडवली व्यवस्था या माध्यमातून लूटपाटीचे नवे तंत्र विकसीत करू इच्छित आहेत. याला साम्यवादी देशही अपवाद नाही. भांडवलवादाला विरोध कामगाराच्या शोषणातून निर्माण झाल्याचे साम्यवादी म्हणत असले तरी त्यांनीही कामगाराचे शोषण करून, पर्यावरणाची हानी करून मोठया प्रमाणात उत्पादन वाढविण्याचा लावलेला सपाटा आजही कायम आहे. हे चित्र असेच कायम राहिले तर आर्थिकदरी वाढण्यासोबतच समाजातील एकात्म चित्राला हादरा बसू शकतो त्यामुळे गांधीचा दृष्टिकोन या प्रश्नाकडे बघताना पूर्णत: मानवतावादी आहे. त्यांनी बडया उद्योग रचनेला केलेला विरोध केवळ विरोधाच्या भावनेतून आलेला नसून त्याला मानवतावादाचा मुलामा आहे. या संदर्भात स्पष्टता आणताना म्हणतात 'हम एक ऐसी जीवनशैली अपनायेंगे, जो गरिबी,भुखमरी और आलस्य या बेकारी से परिपूर्ण नये हिंदुस्थान मे आदर्श के साथ मेल खाती होगी'[३] गांधीनी याकरीता स्वयंपूर्णतेचा रचनात्मक विचार दिला. 'ग्रामोद्योग के पिदे यह कल्पना है की रोज की जरुरत प्राप्त करने के लिए हम गॉवों पर आधार रखे, और उसके लिए अपने आपसे प्रारंभ करे'[४] गांधीची याबाबतीतील निखळ भूमिका समजून घेतल्यास त्या मागील मांडणीची मिमांसा करता येते. त्यांच्या मांडणीत भारताच्या गुलामीची कारणे अंतर्भू आहेत व त्याकरीता डोळसपणे समजून घेण्याची गरज प्रतिपादन करताना म्हणतात ' जब से गॉवो मे चलनेवाले अनेक उद्योगो मे इस मुख्य उद्योग का और इसके आसपास जुडी हुइ कइ दस्तकारियोके बिना सोचे समझे मनमाने तरिके से और बेरहमी के साथ नाश किया गया, तब से हतारे गॉवो की बुध्दी और तेज नष्ट हो गया.वे सब निस्तेज और निष्प्राण बन गये है, और उनकी हालत उनके अपणे भुखो मरनेवाले मरियम ढोरो की सी हो गयी है'[५] गांधी भारताच्या विदारक चित्राला यंत्राच्या अवास्तवतेचे स्तोम कारणीभूत असल्याचे पटवून देतात, वर्तमान काळात गांधी किती औचित्यपूर्ण आहेत हे मग पटू लागते.

**परिणामांची मिमांसा**

गांधीची यंत्राबाबत, तांत्रिक ज्ञानाच्या वाढत्या वापराबाबत ठोस भूमिका होती. मनुष्याच्या भल्यासाठी यंत्र असावे परंतु त्यातून मोठया प्रमाणात बेरोजगारास वाव मिळता कामा नये. एक प्रकारची स्पर्धा ज्यात विवेक गमावलेला असतो अशी यंत्रणा यातून उद्‌भवल्या जाते. भांडवलदार व श्रमीक यांच्यात संघर्ष उद्‌भवतो त्यात दरी वाढायला लागते आणि हिंसाचाराला उत्तेजन मिळते. गरीबी—श्रीमंती यांच्यात प्रचंड विषमतेची दरी निर्माण होते. मानवी पर्यावरण, सृष्टीचे पर्यावरण यांचा विनाश घडून येतो. आरोग्य, सौहार्द यांचे प्रश्न गंभीर बनतात. एक प्रकारे मनुष्य हव्यासी बनतो. आपमतलबीपणा, स्वार्थ, नफ्याची बेसुमार वाढ, व्यक्तीमधील यांत्रिकता मोठया प्रमाणात वाढीस लागल्याने सामाजिक आधारांना धक्का बसतो. गांधी वाढत्या आक्रमक अशा उद्योगवाढीकडे बघताना त्यातील विनाशता, गैरवापर लक्षात घेतात. श्रम करणाऱ्याची संख्या जिथे अधिक आहे अशा स्थितीत मोठी अवजड यंत्रव्यवस्था उभी झाली तर बेरोजगारी मोठया प्रमाणात वाढेल त्यातून समाजात विघातक शक्तींना वाव मिळेल व जे स्वातंत्र्य आपण प्राप्त करू इच्छितो त्याचा सहजतेने विनाश घडून येण्यास वाव मिळेल. गांधीचा तर्कवाद व भूमिका त्यामुळेच प्रासंगिक आहे.सध्या भारतात बेरोजगारी मध्ये झालेली वाढ लक्षात घेतली तर या मागची भिशणता समजून येउ षकते. जवळपास अस्थायी क्षेत्रातील एक कोटी रोजगार गमावलेत, बहुराश्ट्रीय कंपण्यांचा विळखा असाच कायम राहिला तर नजिकच्या काळात बेरोजगारीचे मोठे संकट उभे राहण्याची भीती डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केली आहे. मार्क्स खरा तर ठरणार नाही ना असा प्रश्न पडतो आहे या पाश्वभूमिवर गांधीची प्रस्तुतता लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.

**समालोचन**

गांधी नंतरचा भारत दृष्टिपथात लक्षात घेतला तर गांधीनी मांडलेली भूमिका किती प्रासंगिक राहिली हे स्पष्ट होते. गांधीचा तर्कवाद यथोचित होता. तो याकरीता कारण येथील आर्थिक संदर्भाला तो पूरक होता. येथील भूभाग क्षेत्र, शेतीव्यवस्था, लोकसंख्या यामुळे येथील श्रमीक बेरोजगार राहता कामा नये. प्रत्येकाच्या हाताला काम मिळाले पाहिजेत. आरोग्य, शेती यांचे प्रश्न उग्र बनू द्यायचे नसेल तर लघुउद्योग, ग्रामोद्योग यांना पुरक क्षेत्र निर्माण केले पाहिजेत. यांत्रिकीकरणातून कृत्रिमता जन्म होते त्याचा परिणाम जनमाणसावर पडतो आणि समाज अंधाऱ्या पोकळीत जगू लागतो हे वास्तव तयार होऊ लागते. मोठया रचनात मध्यस्थ, दलाल यांची साखळी तयार होते. आर्थिकतेमुळे सामाजिक दर्जाही बदलल्या जातो. त्यामुळे यामध्ये बदलाव येऊ द्यावयाचा नसेल तर मोठी यंत्रव्यवस्था आपण संदर्भहिन बनविणे आवश्यक आहे. गांधीची मांडणी भारताला पुरक आहे. विद्यमान स्थितीत येथील बेरोजगारी विषमता वाढीस लागलेली आहे. नितीचे, व्यवहाराचे प्रश्न कार्यपूर्ण बनू लागलेत. हिंसा मोठया प्रमाणात वाढीस लागत असून चंगळवाद, भौतिकवाद यांचे वर्चस्व वाढत आहे. भारतात ४० कोटी जनता अर्धउपाशी तर दररोज ३ लक्ष लोक बेरोजगार बनत आहेत. हा केंद्रीत उद्योग व्यवस्थेचा घातक परिणाम होय. पिपासू वृत्तीचा परिचय देणारी यंत्रणाच जगभर उभी झाल्याने अनेक नवे प्रश्न उद्‌भव लागले आहेत. समता विषमता या भेदात न पडता एक तत्व आपण समजून घेतले पाहिजे असे म्हणताना गांधी स्पष्टीकरणार्थ सांगतात' आर्थिक समता म्हणजे प्रत्येक माणसाला समान धन असे नव्हे तर गरजा भागविण्याकरिता पुरेशी साधनसामुग्री प्रत्येक व्यक्तीला उपलब्ध होण ते पुढे म्हणतात मुंगीपेक्षा हत्तीचे खाणे हजारपट असते: पण ते विषमतेचे लक्षण नव्हे. आर्थिक समता म्हणजे प्रत्येकाला आपल्या गरजेप्रमाणे मिळणे होय'.[६] एका बाजूला जागतिक पातळीवर त्या दृष्टीने गांधीचा पर्यायी विकास उभा आहे तर दुसऱ्या बाजूला भांवडवलशाहीतून आलेली डोळे दिपवून टाकणारी विकास रचना आहे ही स्थिती पाहू जाता, समाजमन अस्थिर अशा हिंदोळयावर उभे असल्याचे विद्यमान स्थितीत दिसून येते, त्यावर मंथन करणे आणि नितीच्या व्यवहारात अजून निर्णय होण्यापर्यंत जाणे गरजेचे आहे. व्यक्तीच्या पागलपणावर अंकुश हाच गांधीचा पर्याय होय. एक इशारा म्हणून गांधी समजून घेताना पुढील संदर्भ लक्षात घेणे गरजेचे आहे ' समाजाचे घटक म्हणून सर्व माणसे समान असतील तर यंत्राला माणसाच्या अर्थव्यवस्थेत स्थान नाही. यंत्राने माणसाच्या विकासात कोणतिही भर घातलेली नाही, अशी माझी समजूत आहे. ते योग्य स्थानी ठेवले नाही तर जगाची सेवा न करता त्याचा विध्वंस करील'[७]

तळटीपा :

१. गांधी विचार, ठाकूरदास बंग, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी,२००३ पृ.क्र.५६
२. गांधीवादी समाजवाद, डॉ.उपेन्द्र प्रसाद, नमन प्रकाशन, नइ दिल्ली,२००७ पृ.क्र. १९९
३.रचनात्मक कार्यक्रम वर्तमान संदर्भ मे, दशरथलाल शाह, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी,२००२ पृ.क्र.३४
४. कित्ता, पृ.क्र.३४
५. मेरे सपनो का भारत, म.गांधी, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी,२००७ पृ.क्र.८१
६. म. गांधीची विचारसृष्टी काही अलक्षीत पैलु, यशवंत सुमंत,साधना प्रकाशन, पुणे,२०१६ पृ.क्र.४१
७. कित्ता, पृ.क्र.४३